International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# महाराष्ट्रातील आरक्षणाचा प्रश्न

**प्रा. डॉ. सचिन महादेव पाटील**
*श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील*
*कन्या महाविद्यालय, इस्लामपूर*
*Corresponding Author - प्रा. डॉ. सचिन महादेव पाटील*
**DOI - 10.5281/zenodo.10940622**

**प्रस्तावना :**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या रूपाने पुन्हा जिवंत झालेला प्रश्न हा फक्त मराठा समाजापुरताच मर्यादित नाही तर त्याची मुळ प्रत्येक समाजातील तळागाळापर्यंत पोहोचलेली दिसतात. आरक्षण हा मुद्दा आपल्याला जरी महत्त्वपूर्ण वाटत असला तरी प्रस्थापित राजकीय नेत्यांचे भकास विकासाचे चित्र दिसत आहे. संसदेमध्ये अश्रू धुराची नळकांडी फोडणारा दलित समाजातील अमोल शिंदे, जरांगे पाटलांच्या मागे उभा असलेला मराठा तरुण, भुजबळांच्या एल्गार सभांना जमा होणारा ओबीसी तरुण, पडळकर यांच्या मागे उभा असणारा धनगर समाजातील तरुण या सर्व नेत्यांच्या मागे एकच समान धागा आहे तो म्हणजे तरुण, या सर्व तरुणांचे प्रश्न सारखेच आहेत रोजगार, शासनातील पारदर्शी भरती, भ्रष्टाचारी व्यवस्था, उत्तम शिक्षण अभाव, डबघाईला आलेली शेती, हमीभाव इत्यादी. मराठा आरक्षणाच्या रूपाने चालू असणाऱ्या आंदोलनाकडे फक्त आरक्षण म्हणून बघण्यापेक्षा देशभरात तरुणांच्या मनामध्ये वाढत असलेल्या असंतोषांकडे गांभीर्याने बघणे गरजेचे आहे, हा फक्त मराठा समाजाचा प्रश्न नसून देशातील प्रत्येक बेरोजगार लोकांचा प्रश्न आहे.

**उद्दीष्टे:**

1. महाराष्ट्रातील आरक्षणाचा प्रश्न अभ्यासणे.
2. आंदोलनाची कारणे अभ्यासणे.
3. आंदोलन आणि दारिद्र्य,बेरोजगारी यांच्या परस्पर सम्बन्ध तपासणे.
4. आरक्षणा मागील राजकारण अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करून माहिती संकलित करून माहितीच्या आधारे विश्लेषण करून सदर सशोधन पेपर तयार केलेला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना अजून देखील आपल्याला मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून असलेल्या मूळ प्रश्नापर्यंत पोहोचता आलेले नाही. 1991 मध्ये आलेले

जागतिकीकरण यांनी जे काही चांगले आणि वाईट परिणाम भारतीय समाजाला दिले. आपण एका नव्या स्थित्यंतरातून जात आहोत 1990 च्या दशकाला हा पहिला टप्पा भारताने सेवा क्षेत्रात मुसंडी मारून देशाच्या आर्थिक विकासदर वाढविण्याच्या टप्पा होता, त्याला इंडियन ग्रोथ स्टोरी असेही म्हटले गेले यातून समाजामध्ये एका व्यापक पातळीवर आपण विकसित राष्ट्र बनावे अशी आकांक्षा तयार होत गेली आणि त्यातून दुसऱ्या टप्प्यात विकास संकल्पना विकसित झाली 1990 नंतर जे प्रामुख्याने बदल झाले त्यातील तीन महत्त्वाचे मुद्दे.

1. तंत्रज्ञानाच्या वापरात वाढ
2. पुरवठा साखळीमध्ये सुधारणा
3. लायसन्स राजपासून मुक्ती

75 वर्षात जे महत्त्वाचे बदल झाले त्यामध्ये 1.दारिद्र्यात झालेली घट 2. विषमतेत झालेली वाढ

**दारिद्र्य:**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील समाज आर्थिक दृष्ट्या जेरीला आलेला आहे. "एकूणच ग्रामीण महाराष्ट्रात उत्पन्नाच्या बाबत साचलेपणा आलेला आहे. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी' ही खाजगी संस्था दर तिमाहीला ग्रामीण आणि शहरी भारतातील लोकांचे उत्पन्न खर्च याचे नमुना सर्वेक्षण करते एप्रिल 2023 मध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न रुपये 22,342 आहे, पण 50% कुटुंबाचे मासिक उत्पन्न 14,100 पेक्षा कमी आहे. 2022 च्या एप्रिलमध्ये ग्रामीण कुटुंबाचे सरासरी उत्पन्न 20,706 इतके होते. म्हणजे गेल्या वर्षभरात सरासरी ग्रामीण कुटुंबाचे उत्पन्न 8% टक्क्यांनी वाढले, पण त्याचबरोबर महागाई 6% वाढली. म्हणजे प्रत्यक्षातली उत्पन्न वाढ अगदी कमी याचबरोबर ग्रामीण महाराष्ट्रात उत्पन्नात विषमता खूप आहे. उत्पन्नाचा आकडा 0.56 इतका आहे. एप्रिल 22 मध्ये हाच आकडा झिरो 0.55 इतका होता. ग्रामीण भारताचा उत्पन्न विषमतेचा आकडा महाराष्ट्रापेक्षा कमी म्हणजे 0.49 आहे. महाराष्ट्रातून शहरी भाग काढून टाकला तर ग्रामीण महाराष्ट्रातील मानसी उत्पन्नाची परिस्थिती ग्रामीण उत्तर प्रदेश पेक्षा वाईट आहे".1

**विषमतेमधील वाढ:**

त्याच वेळी, या सुधारणांची अंमलबजावणी झाल्याच्या तीन दशकांमध्ये असमानतेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. "अब्जाधीशांच्या संपत्तीने आकाशाला गवसणी घातली आहे. समाजातील कनिष्ठ स्तरातील वर्गाचे राष्ट्रीय संपत्तीमधील योगदान कमी होत चालले आहे. नव्वदच्या दशकात फोर्ब्सच्या यादीत भारतातील एकही नाव नव्हते. 2000 पर्यंत 9 जणांची यादीत वर्णी लागली होती तर 2017 मध्येच हाच आकडा 117 पर्यंत पोहोचला, 2022 मध्ये ही संख्या 166 होती. अब्जाधीश सर्वात जास्त असलेल्या देशांच्या यादीत रशियानंतर भारताचा क्रमांक लागतो. 2017 च्या 'ऑक्सफॅम रिपोर्टनुसार' 77% राष्ट्रीय संपत्ती 10% लोकांकडे

एकवटली आहे. सर्वात श्रीमंत 1% नागरिकांकडे 58% राष्ट्रीय संपत्ती आहे".2

"नुकताच नाईट 'फ्रँक' या जागतिक गृह वित्त सल्लागार संस्थेचा अहवाल प्रकाशित झाला, ही संस्था लंडन स्थित आहे या अहवालानुसार आगामी चार वर्षात म्हणजे 2028 पर्यंत महाधनिकांची संख्या वाढण्याचा वेग जगात सर्वात कोणत्या एका देशात असेल तर तो म्हणजे भारत, महाधनिक म्हणजे ज्यांची संपत्ती किमान तीन कोटी डॉलर्स इतकी व अधिक आहेत असे लोक. या अहवालानुसार आगामी चार वर्षात भारतीयांच्या संपत्तीत तब्बल 50 टक्क्यांनी वाढ होईल आणि या धनकुबेरांची संख्या भारतात सर्वात अधिक असेल, त्या खालोखाल क्रमांक आपल्या शेजारील चीनचा आहे व तिसऱ्या क्रमांकावर टर्की या देशाचा नंबर लागतो या सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सदर यादीत पहिल्या पाचात एकही विकसित म्हणता येईल असा देश नाही ना अमेरिका, ना स्विझर्लंड, ना अन्य कोणता युरोपीय देश. देशाचा विकास मुठभर लोकांच्या संपत्तीत वाढ झाली म्हणजे होत नाही, सर्व सामान्य लोकांचा विकास हा विकासचा मुळ मुद्दा आहे. 3

**भारतातील अब्जाधीशांची संख्या**

| अ.क्र. | वर्ष | संख्या |
|---|---|---|
| 1 | 2000 | 9 |
| 2 | 2005 | 27 |
| 3 | 2010 | 69 |
| 4 | 2015 | 90 |
| 5 | 2017 | 119 |
| 6 | 2021 | 142 |
| 7 | 2022 | 166 |

(स्रोत: फोर्ब्स)

उत्पन्नाची आकडेवारी पाहता, 1990 मध्ये सर्वात श्रीमंत 10% लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 34.4 % होता. तर सर्वात गरीब 50% लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा हिस्सा 20.3% वाटा होता, 2018 पर्यंत हेच प्रमाण अनुक्रमे 57.1% आणि 13.1% होते. त्यानंतर, कोव्हिडची परिस्थिती उद्भवली असताना ऑक्सफॅम रिपोर्टनुसार सर्वात श्रीमंतांचे उत्पन्न कैक पटींनी वाढले. 4

वरील सर्व चित्र आणि आकडेवारी पाहता आशादायक चित्र दिसत नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जेवढी विकास कामे सामान्य लोकांच्या पर्यंत पोहोचायला हवी होती ती पोचली नाहीत, त्याचाच परिणाम जागतिक शेती स्पर्धेत भारतातील शेतकरी टिकू शकत नाही, जो शेतकरी टिकला तो उच्च उत्पन्न गटातील असलेला दिसतो. साहजिकच "जागतिकीकरणात शेतकी अर्थव्यवस्था आणि संस्कृती पतनास लागली,

शेतीला लोकसंख्येचा भार पेलेनासा झाला, शहराकडे स्थलांतर वाढले या पार्श्वभूमीवर परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आणि टिकून राहण्यासाठी एक आगतिक आक्रमकता भारत भर तयार होताना दिसते. शेतीला सरकारी नोकऱ्यांचे पर्याय उभे करण्यासाठी म्हणून मराठा आरक्षणासारखे आंदोलन विविध राज्यात होऊ लागल्याचे दिसते हा या प्रक्रियेचा परिणाम आहे. आज शेती करणे परवडण्यासारखे नाही. वाढते खताचे भाव, कमी दर, नैसर्गिक आपत्ती आणि सरकारकडून मिळणारी तुटपुंज मदत यामुळे शेतकरी पूर्ण थकून गेला आहे. सध्याचे कांद्या निर्यात बंदी आणि दिल्लीमध्ये होत असलेली शेतकऱ्यांचा आंदोलन हे या परिस्थितीचे बोलके चित्र आहे. 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने' 2019 साली भारतातील शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या परिस्थितीवर एक अहवाल प्रकाशित केला आहे. महाराष्ट्रातील 50% पेक्षा जास्त कुटुंबांकडे असलेली शेती 0.4 हेक्टर पेक्षा कमी आहे, तर 25% कुटुंबांची शेती नगण्य म्हणजे 0.001 हेक्टर पेक्षा कमी आहे, सरासरी पहायची तर कृषी कुटुंबा मागे 0.84 हेक्टर एवढीच शेती आहे. देशातील इतर कुठल्याही राज्यात इतके तुकडीकरण झालेले नाही. 73% कुटुंबे ही प्रामुख्याने शेतीतून येणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहेत. सगळा उत्पादन खर्च वजा जाता महाराष्ट्रातील कृषी कुटुंबांचे पिकापासून मिळणारे सरासरी उत्पन्न 2018-2019 साली 3,790 रुपये होते”5. एवढ्या पैशात चार जणांचे कुटुंब दारिद्र्यरेषेच्या वर येऊ शकत नाही अशावेळी जोड व्यवसाय उपयोगी येतो एवढे सगळे करून कृषी कुटुंबांचे सरासरी उत्पन्न महिन्याला 9,592 रुपये जाते. म्हणजेच वर्षाला जेमतेम लाखभर रुपये. आजच्या परिस्थितीमध्ये लोकांच्या गरजा एवढ्यात कशा भागणार, त्यातच सरकारी शाळांच्या दुरावस्थेमुळे खाजगी शाळांकडे पालकांचा ओढा वाढला आहे.

सरकारी नोकऱ्या देताना भ्रष्ट पद्धतीने शिक्षक नेमले जातात त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होतो. ‘असर’ म्हणजे ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन. भारतातील शिक्षण क्षेत्रात गेल्या दशकभराहून अधिक काळ काम करत असलेल्या ‘प्रथम’ या स्वयंसेवी संस्था हे सर्वेक्षण करून अहवाल प्रसिद्ध करते. या संस्थेने या वर्षीचा आपला अहवाल प्रसिद्ध केला यामध्ये "देशभरातील 26 राज्यांमधील 28 जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्यात आलं. सर्व जिल्हे ग्रामीण भागातील होते. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात प्रत्येकी दोन जिल्हे, तर इतर ठिकाणी एक-एक जिल्ह्यात सर्वेक्षण करण्यात आलं.

1. 14 ते 18 वयोगटातील 25% विद्यार्थ्यांना मातृभाषेतील परिच्छेद वाचता आला नाही. दुसरीच्या इयत्तेतील विद्यार्थ्यांना वाचता येणं अपेक्षित असलेला परिच्छेद या विद्यार्थ्यांना देण्यात आला होता.
2. केवळ 43.3% विद्यार्थ्यांना भागाकाराची गणितं सोडवता आली.
3. इंग्रजीतील सोपी वाक्य केवळ 57.3% विद्यार्थ्यांना वाचता आली आणि त्यातील

73.5% जणांना त्या वाक्यांचे अर्थ सांगता आले.

4. जवळपास 90% विद्यार्थ्यांच्या घरात स्मार्टफोन आहे आणि त्यांना तो कसा वापरावा हे माहित आहे. मुलींपेक्षा मुलांना अधिक स्मार्टफोन वापरता येतं, असंही सर्वेक्षणात समोर आलं.
5. एकूणच 'असर 2023 : बियाँड बेसिक्स' अहवालाने शिक्षण क्षेत्रातील विदारक स्थितीच समोर आणली आहे."6 त्यामुळे आपल्या वाट्याला आलेले जीवन आपल्या मुलांना येऊ नये या दृष्टिकोनातून खाजगी शाळांकडे विद्यार्थ्यांना घालण्याचा कल वाढला आहे.

**बेरोजगारी:**

सेंटर फॉर मॉनिटरिंग द इंडियन इकॉनॉमी (CMIE) च्या मते, जुलै 2023 पर्यंत भारतातील बेरोजगारीचा दर 7.95% इतका होता.

| 2013–2023 पर्यंत भारतातील बेरोजगारी दरीची यादी | |
|---|---|
| 2023 | 8.40% |
| 2022 | 7.33% |
| 2021 | 5.98% |
| 2020 | 8.00% |
| 2019 | 5.27% |
| 2018 | 5.33% |
| 2017 | 5.36% |
| 2016 | 5.42% |
| 2015 | 5.44% |
| 2014 | 5.41% |
| 2013 | 5.42% |

https://www.google.com/amp/s/www.adda247.com/mr/jobs/unemployment-rate-in-india/amp/

| राज्यनिहाय भारतातील बेरोजगारी दर 2023 | |
| --- | --- |
| राज्य | बेरोजगारी टक्केवारी |
| हरियाणा | 37.4 |
| राजस्थान | 28.5 |
| बिहार | 19.1 |
| झारखंड | 18 |
| त्रिपुरा | 14.3 |
| सिक्कीम | 13.6 |
| गोवा | 9.9 |
| आन्द्रप्रादेश | 7.7 |
| हिमाचल प्रेदेश | 7.6 |
| आसाम | 4.7 |
| छत्तीसगड | 3.4 |
| मध्यप्रदेश | 3.2 |
| महाराष्ट्र | 3.1 |
| कर्नाटक | 2.5 |
| गुजरात | 2.3 |
| ओडीसा | 0.9 |

https://www.google.com/amp/s/www.adda247.com/mr/jobsunemployment-rate-in-india/amp

. "महाराष्ट्राची आजची लोकसंख्या आपण 14 कोटी मानल्यास 2021 मध्ये जनगणना झालेली नसल्यामुळे यापुढे सगळेच उल्लेख अंदाजे आहेत 14 कोटी पैकी 65% लोक काम करू शकणाऱ्या वयातली म्हणजे साधारण नऊ कोटी 'पीरॉडिक लेबर फोर्स' सर्वेनुसार महाराष्ट्रातील 57% लोक काम शोधत आहेत किंवा काम करत आहेत, म्हणजे झाले 5.18 कोटी यातील 45% लोक अजूनही तोट्याच्या शेतीतच आहेत, त्यातून त्यांना काही मिळत नाही. राष्ट्रीय नमुना चाचणी संस्थेने 'ग्रामीण भारतातील कृषी कुटुंबे आणि त्याची जमीन तसेच गृह धोरणेचे परिस्थितीत मग मूल्यांकन 2019' हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात महाराष्ट्रात सर्वसामान्य कृषक कुटुंबांचे स्त्रोत दिलेले आहेत. 2012 साली ग्रामीण महाराष्ट्रातील सरासरी 4.5 सदस्यांच्या कुटुंबाला दारिद्र्यरेषेच्या वर येण्यासाठी महिन्याला रुपये 4351 आवश्यक होते. हा खर्च 2012 च्या किमती गृहीत धरून आहे. धक्कादायक बाब अशी की 2012 पासून किमती स्थिर राहिल्या असत्या तरीसुद्धा महाराष्ट्रातील सरासरी शेतकरी कुटुंबाला 2018-2019 मध्ये दारिद्र्यरेषा पार करता आली नसती. वाढत्या किमती लक्षात घेतल्या तर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. ऑक्टोबर 2012 च्या तुलनेत ऑक्टोबर 2018 मध्ये राज्यात ग्रामीण भागात किमती 128% वाढल्या. म्हणजे मासिक ग्रामीण

दारिद्र्यरेषा सुद्धा तेवढीच वाढवून रुपये 5569.28 इतकी करावी लागेल. केवळ पिकांवर अवलंबून असल्यास सर्वसामान्य कुटुंबाला दारिद्र्यरेषा गाठताच येणार नाही. शिवाय ही सरासरी आकडा आहे. महाराष्ट्रातील 45% कुटुंबे सीमांत भूधारक आहेत आणि आणखी 25% अल्पभूधारक आहेत त्यामुळे शेतीबाहेर काहीतरी रोजगार शोधावाच लागत आहे. 2.8 कोटी लोक रोजगार शोधात आहेत."7 यात सुद्धा त्यांना फारसे यश मिळाल्याचे दिसत नाही.

जरांगे पाटलांच्या आंदोलनाच्या मागे उभारलेले तरुण खऱ्या अर्थाने बेरोजगार आणि शेतीतला वैतागलेला आहे. आज देशात ज्या पद्धतीने औद्योगीकरण, विकास, शहरीकरण याचे चित्र आपल्याला विविध माध्यमांच्या द्वारे दाखविले जात आहे त्या प्रमाणात भारतात रोजगार वृद्धी झालेली नाही, ही खरी अडचण आहे. वरील देलेल्या माहिती वरून शिक्षणाची अवस्था पाहता त्यातून तयार होणारे मनुष्यबळ सक्षम असल्याचे पाहायला मिळत नाही, त्यामुळे भविष्यातील या तरुण पिढीला रोजगार मिळेल याची खात्री देता येत नाही. शिवाय साध्या साध्या व्यवसायात तंत्रज्ञानाचा वापर वाढत चालला आहे. भविष्यात ज्या क्षेत्रात नोकऱ्या निर्माण होतील त्या क्षेत्रात चांगले प्रशिक्षित मनुष्यबळ लागणार आहे ते आपण निर्माण करीत नाही. आज देखील बऱ्याचशा शाळा, महाविद्यालय, इंजिनिअरिंग कॉलेजेस मध्ये अपुरा कर्मचारी वर्ग म्हणजेच 70% प्राध्यापक कंत्राटी असून तटपुंज पगारावर काम करतात विद्यार्थ्यांना लागणारी साधने अपुरी आहेत.

अशा विदारक परिस्थितीतून वाटचाल करत असताना जरांगे पाटलांच्या सारखा आंदोलनकरता अशा तरुणांना खरा आधार आणि दिशा दर्शक वाटतो. यांची प्रेरणा घेऊन लोक व्यवस्थेला भीडताना दिसतात, जातीय आधारित आरक्षणाच्या मागे असलेल्या संधीची समानता व सामाजिक न्याय या तत्त्वापलीकडे जाऊन एक व्यापक आणि मजबूत मध्यमवर्ग तयार करण्यात आपल्या व्यवस्थेला अजून यश मिळालेले नाही आणि आजची परिस्थिती पाहता पुढील कालावधीत दिशा मिळेल असे वाटत नाही. आरक्षण हा सर्वच प्रश्नांना उत्तर आहे असं नाही पण सरकारच आपले मायबाप आहेत अशी अपेक्षा आपल्या सामान्य जनतेला असणे हे लोकशाही व्यवस्थेचे द्योतक आहे.

देशात कितीही अब्जाधीशची संख्या वाढली तरी सुद्धा कोणताच देश हा स्थिर आणि सुखी मध्यमवर्गाशिवाय विकसित देश होत नाही. मोबाईल सारख्या तंत्रज्ञानामुळे पाश्चात्त्य देशातील जीवनशैली आमच्या तरुणांना खुणावत आहे, परंतु त्यासाठी लागणारे सक्षम साधने, व्यवस्था उपलब्ध नाही. काही प्रमाणात सर्विस सेक्टरमध्ये काम करणाऱ्या मर्यादित उच्च मध्यम वर्गाला थोड्याफार प्रमाणात अशी संधी प्राप्त झाले आहे. कागदोपत्री विकासाच्या कितीही गप्पा मारल्या आणि कितीही आकडेवारी दाखवली तरी दरवर्षी नव्याने रोजगार योग्य झालेला तरुण वर्ग, कमी उत्पादकतेच्या आणि

अनिश्चित रोजगाराच्या क्षेत्राकडे ढकलला जात आहे. रोजगार हमी योजनेवर मजुरी मिळविण्याची मागणी वाढत आहे ही सारी अस्वस्थता समजून घेणे गरजेचे आहे.

ही अस्वस्थता लक्षात घेऊन सरकारने मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत यासारख्या योजना राबवून उभारी देण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु प्रशासनाचे उदासीनता, दप्तर दिरंगाई, कमिशन यामध्ये या योजना अडकून पडलेल्या दिसतात. ज्या राष्ट्रांनी आपल्या मूलभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली, उत्तम प्राथमिक आणि उच्च शिक्षण व्यवस्था निर्माण केल्या. सर्वसामान्यांना उत्तम आरोग्य आणि आधुनिक क्षेत्राचा विकास केला त्यांची प्रगती झालेली दिसते. परंतु दुर्दैवाने आपल्याकडे मात्र असे झाले नाही, आपण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अजूनही चांगल्या प्राथमिक शाळा तयार झाल्याचे चित्र पहावयास मिळत नाही, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर आणि कोरोना परिस्थितून आपण आरोग्याच्या समस्या सोडवू शकलो नाही. नंदुरबार सारख्या जिल्ह्यात कुपोषणावर उपाय करणे तर दूरच, बाळाचे वजन मोजण्याचे यंत्र सुद्धा उपलब्ध नाही. राजधानी पासून किमान दीडशे दोनशे किलोमीटर अंतरावर असलेल्या एका खेड्यात कविता नावाच्या गर्भवती स्त्रीला वेळेत वाहन, डॉक्टर यांची व्यवस्था न झाल्यामुळे या व्यवस्थेचा ती बळी ठरली.

अशावेळी आरक्षणाच्या माध्यमातून आपल्या ग्रामीण शैलीत जेव्हा जरांगे पाटलांसारखा व्यक्ती आवाहन करतो आपल्या 'लेकरांच्या भविष्यासाठी मैदानात उतरा' त्यावेळी सर्व राजकीय बंधने झुगारून सर्वसामान्य कार्यकर्त्याला सुद्धा आपल्या मुलांच्या भविष्यासाठी एकवटतो. म्हणून शासन आणि प्रशासनाने तात्पुरती मलम पट्टी नकरता, मुलभूत सोई सुविधा उत्तम दर्जाच्या करायला हव्यात.

**संदर्भ:**


1) नीरज हातेकर, लोकसत्ता, रविवार, 31 डिसेंबर 2023.
2) https://www.google.com/amp/s/www.bbc.com/marathi/india-62540041.amp
3) संपादकीय, लोकसत्ता, मंगळवार 12 सप्टेम्बर 2023.
4) https://www.google.com/amp/s/www.bbc.com/marathi/india-62540041.amp
5) नीरज हातेकर,लोकसत्ता, रविवार 5 नोव्हेंबर 2023
6) https://www.google.com/amp/s/www.bbc.com/marathi/articles/cmjr27k1eppo.amp
7) निरज हातेकर, रविवार, 31डिसेंबर 2023
8) हर्षवर्धन पुरंदरे, लोकसत्ता, मंगळवार, 30 जानेवरी 2024.
9) देवेंद्र गावंडे, लोकसत्ता, गुरुवार, 25 जानेवरी 2024.